# अंत्यसंस्कारावेळी काळजी घेतल्यास धोका नाही

## प्रयास आरोग्य गट आणि पूना सिटीझन डॉक्टर फोरमची सूचना

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'करोनामुळे मृत झालेल्या व्यक्तीचा मृतदेह हातमोजे घालून उचलल्याने, स्मशानभूमीत पार्थिवाला स्पर्श न करता अंत्यसंस्कार केल्याने विषाणूची लागण होण्याची शक्यता नाही,' असे प्रयास आरोग्य गट आणि पूना सिटीझन डॉक्टर फोरमने स्पष्ट केले आहे.

करोनामुळे मृत पावणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढत असून, विषाणूच्या प्रसाराची भीती आणि गैरसमजामुळे मृत व्यक्तींवर अंत्यसंस्कारासाठी नागरिक पुढे येत नसल्याने, हे काम स्वयंसेवकांना करावे लागत असल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रयास आरोग्य गटाचे डॉ. विनय कुलकर्णी आणि पूना सिटीझन डॉक्टर फोरमचे डॉ. अनंत फडके, डॉ. अरुण गद्रे, डॉ. शारदा बापट, डॉ. श्रीराम गीत यांनी प्रसिद्धीपत्रक काढून करोनाग्रस्तांवर अंत्यसंस्कार करताना काय काळजी घ्यायला हवी, याबाबत सूचना दिल्या आहेत.

करोना हा श्वसन संस्थेचा आजार असून, लागण झालेल्या व्यक्तीच्या शिंकणे, खोकणे, बोलणे, थुंकणे या क्रियांमधून विषाणू बाहेर फेकला जातो. मृत्यूनंतर या सर्व क्रियांमार्फत होणारा प्रसार थांबत असून, फक्त मृतदेहाच्या अंगावरील आणि नाका-तोंडातील स्रवात असलेल्या विषाणूपासून दूर राहणे गरजेचे आहे. त्यासाठी मृतदेहाला किंवा नाका-तोंडातुन स्राव आला असेल, तर हातमोजे घातल्याशिवाय स्पर्श करू नये, अशी काळजी घेण्याचे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

मृतदेहाबरोबर शववाहिकेतून प्रवास करणे, हातमोजे घालून मृतदेह उचलणे, मृतदेहाला स्पर्श न करता दर्शन घेणे, स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी गेल्याने विषाणूची लागण होण्याची शक्यता नाही. अंत्यसंस्काराच्या वेळी आयसीयूमध्ये घालतात तसा नखशिखांत संरक्षक पोशाख घालण्याची गरज नाही; तसेच अग्नी दिल्यानंतर राखेत किंवा प्रेताचे दफन केलेल्या मातीत हा विषाणू जिवंत राहू शकत नाही. त्यामुळे राखेवर किंवा जमिनीवर जंतुनाशक फवारणी करण्याची आवश्यकता नाही, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### अंत्यसंस्कारानंतर ही पथ्ये पाळा...

- मास्क वापरणे, साबणाने हात धुणे.
- तोंड-नाक-डोळ्यांना हात न लावता हाताच्या बाहीचा वापर करणे.
- दुसऱ्या व्यक्तीपासून सहा फुटांचे अंतर राखणे.
- घरी आल्या-आल्या थेट आंघोळीला जाणे.
- अंगावरचे कपडे साबणाच्या पाण्यात भिजत घालणे.

### मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यापूर्वी आरोग्य कर्मचाऱ्यांनी घ्यावयाची काळजी

(केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या सूचना)

- मृत व्यक्तीच्या नाका-तोंडात किंवा इतरत्र घातलेल्या नळ्या काढून, त्या एक टक्के सोडिअम हायपोक्लोराइटच्या द्रावणात( ब्लीचिंग सोल्यूशन) बुडवून त्यांची विल्हेवाट लावावी.
- नाका-तोंडातून, उघड्या जखमांतून स्राव बाहेर पडू नयेत याची खबरदारी घ्यावी.
- मृतदेह प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळावा; ती पिशवी बाहेरून ब्लीचिंग सोल्यूशनने पुसून घ्यावी; त्यावरून दुसरे आवरण घालावे.
- मृत व्यक्तीचे उरलेले कपडे, वस्तू, तिथली जागा या सगळ्याची ब्लीचिंग सोल्यूशन वापरून स्वच्छता करावी.

---

# 'रिं...
# सर्व...

पुणे : 'पुणे आणि... वाढत्या परिसराचा ... सार्वजनिक वाहतुकीच... रोड अत्यंत आवश्यक... सरकारच्या मदतीने ह... लावण्यासाठी शक्य ... करण्यात येईल,' असे ... केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक... गडकरी यांनी शहरा... व्यावसायिकांच्या प्रतिनिधी... राज्य सरकार आणि पुणे... विकास प्राधिकरणाने (... एकत्रित येऊन योग्य... केल्यास पुण्याचा चेहराम... रिंग रोड प्रत्यक्षात येऊ... विश्वास गडकरी यांनी ...

नॅशनल रिअल इस्टे... कौन्सिलतर्फे (नरेडक... वेबिनारमध्ये पुण्याभो... रोडविषयी मुकेश ... विचारलेल्या प्रश्नाला उ... रिंग रोडसाठी केंद्र सरका... मदत करण्याची ग्वाही...